पुणे पत्रकार सह. गृहरचना संस्था (मर्यादित)
रजि. नं. PNA/HSG/
६५८ ता. ३० - १ - १९७१
ता.
पत्रकारनगर, पुणे - ४११ ०१६.

## विशेष सर्वसाधारण सभा अहवाल

विषय : दिनांक २१ - ६ - २६ च्या विशेष सर्वसाधारण सभेचे वृत्तांत.

पत्रकार नगर च्या पुनर्निर्माण प्रक्रियेत खालील महत्वाच्या विषयांवर निर्णय घेण्या करिता सोसायटी च्या मधुकर जोशी सभागृहात आयोजित ह्या विशेष सर्वसाधारण सभेला ८० सभासद / सह सभासद उपस्थित होते. दोन सभासद प्रस्तावावर मतदान झाल्या नंतर उपस्थित झाले.

अध्यक्ष श्री विजय सावंत यांनी सर्व उपस्थित सभासदांचे स्वागत करून आणि सभेच्या आयोजनाचे कारण सांगून सभेची सूत्रं सचिव श्री विनायक पटवर्धन यांच्या कडे दिली.

सर्व प्रथम श्री प्रदीप नेवाळकर यांनी आत्ता पर्यंत पुनर्निर्माण प्रकल्पाच्या झालेल्या वाटचाली चा आढावा घेतला आणि सांगितले की दिनांक १० - ५ - २६ रोजी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेच्या निर्णया प्रमाणे एकूण ९१ सभासदांनी त्यांच्या घरांचा ताबा पंच समिती कडे दिला आहे. आपल्या डेव्हलपमेंट अॅग्रीमेंट प्रमाणे जोवर सर्व १०२ सभासद त्यांच्या घराचा ताबा संस्थेला देत नाही तवर सभासदांना ठरल्या प्रमाणे घरभाडे देता येत नाही. ह्या ११, घरांचा ताबा न देणाऱ्या, सभासदांमुळे ९१ सभासदांचे नुकसान होत आहे. तेंव्हा घर सोडणाऱ्या सभासदांना जून महिन्या पासून चे घर भाडे मिळावे आणि त्या दृष्टीने काही पर्यायी उपाय सभासदांपुढे ठेऊन तो मंजूर व्हावा हा विशेष सर्वसाधारण सभेचा पहिला मुद्दा. त्यांनी असे ही आव्हान केले की ज्या सभासदांनी सोसायटी वर कोर्ट केस केल्या आहेत त्या त्यांनी चालू ठेवाव्या कारण तो त्यांचा अधिकार आहे पण त्यांनी त्यांच्या घरांचा ताबा सोसायटी कडे द्यावा जेणे करून पुनर्निर्माण प्रक्रिया सुरळीत चालू राहील. ह्या वर काही सभासदांनी ठरावात काही महत्वाच्या सुधारणा करण्या संबंधी सूचना केल्या. त्या मान्य करून सभासदांच्या मतांसाठी खालील ठराव मांडण्यात आला.

### ठराव क्रमांक १ -

संस्थेच्या पुनर्निर्माणात बिल्डर बरोबर झालेल्या डेव्हलपमेंट अॅग्रीमेंट प्रमाणे जोवर सर्व १०२ सभासद त्यांची घरं रिकामी करून बिल्डर ला सोसायटी चा ताबा देत नाही तोवर सभासदांना घरभाडे देणे बिल्डर ला बंधनकारक नाही. संस्थेच्या १०/५/२६ च्या विशेष सर्वसाधारण सभेच्या ठरावा प्रमाणे एकूण ९१ सभासदांनी त्यांच्या सदनिका रिकाम्या करून त्याच्या किल्या पंच समिती कडे दिल्या आहेत. ह्या ९१ सभासदांना जून २६ पासून ठरलेले घरभाडे मिळावे ह्या करिता पर्यायी उपाय म्हणून बिल्डरने संस्थेला प्रकल्पात मिळणारी कमर्शियल जागा (समाज मंदिरा ची) दीड - दोन वर्षात बांधून त्याच्या उत्पन्नातून अश्या भाड्यापोटी दिलेली रक्कम

बिनव्याजी वसूल करावी असा प्रस्ताव ही सभा बिल्डर ला देत आहे. तसेच ह्या करिता आवश्यक अटी - शर्ती ठरविण्यासाठी पंच समिती ला अधिकृत करीत आहे.

सूचक : श्री महेश प्रभूदेसाई
अनुमोदक : श्री प्रणव लेले
वरील ठराव ८० विरुद्ध ० अश्या मताधिक्याने संमत करण्यात आला.

ह्या नंतर श्री अनंत शाळीग्राम यांनी सभेला दुसऱ्या ठरावाची आवश्यकता विषद केली. ह्यात जे सभासद प्रकल्पा ला पुढे नेण्या करिता सपोर्ट करत नाहीये त्यांच्या विरुद्ध १० - ५ - २६ च्या ठरावा प्रमाणे कार्यवाही करण्याचे त्यांनी सांगितले तसेच बिल्डर ला प्रकल्पा चे काम सुरू करण्याच्या दृष्टीने पत्रे लावण्याचे आणि आंशिक ताबा देण्याची तारीख नक्की करण्याचा ठराव मंजूर करण्याचे आवाहन केले. ह्या वर काही सभासदांनी ठरावात काही महत्वाच्या सुधारणा करण्या संबंधी सूचना केल्या. त्या मान्य करून खालील ठराव सभासदांच्या मतांसाठी ठेवण्यात आले

ठराव क्रमांक २ -

दिनांक २१/६/२६ पर्यंत ९१ सभासनी त्यांच्या सदनिकेचा ताबा सोसायटी कडे देऊन बाहेर पडले आहेत. अश्या स्थितीत सुरक्षा व्यवस्थेच्या दृष्टीने सोसायटी ने आपल्या बिल्डर ला सोसायटी च्या सुरक्षाभिंती च्या कडेने पत्रे लावण्याची सुरवात येत्या २५ तारखे पासून करावी अशी सूचना करण्याचा ठराव ही सभा संमत करीत आहे. तसेच ३० जून २०२६ नंतर सोसायटी चा आंशिक ताबा बिल्डर कडे देण्यास आणि त्या करिता लागणाऱ्या सर्व अटी - शर्ती ठरविण्यास पंच समिती ला अधिकृत करीत आहे.

३० जून २०२६ नंतर सोसायटीच्या आवारात राहणाऱ्या सभासदांच्या सुरक्षेची कुठल्याही प्रकार ची जिम्मेदारी संस्थेची अगर पंच समिती ची नसेल.

सूचक : श्री दिलीप पटवर्धन
अनुमोदक : श्री अरविंद करंदीकर
वरील ठराव ७९ विरुद्ध १ अश्या मताधिक्याने संमत करण्यात आला.

पुणे पत्रकार सह. गृहरचना संस्था (मर्यादित)
रजि. नं. PNA / HSG / ६५८ ता. ३० - १ - १९७१
ता.

श्री पटवर्धन यांनी सांगितले की ६ सभासद दिनांक ३० - ६ - २६ पर्यंत त्यांच्या घरांचा ताबा पंच समिती कडे देतील अशी त्यांची माहिती आहे. तीन सभासद, ज्यांनी व्यक्तिगत कारणांमुळे सोसायटी विरुद्ध कोर्ट केस केल्या आहेत, एक सभासद ज्यांच्या पारिवारिक वादामुळे आणि हा विषय कोर्टात असल्याने कुठला ही निर्णय घेणे शक्य होत नाहीये तसेच एक सभासद जे सोसायटीला कुठल्या ही बाबतीत सहयोग करीत नाही अश्या पांच सभादासन मुळे इतर सभासदांचे नुकसान होत आहे.
सभासदांच्या आग्रहावर श्री पटवर्धन यांनी ह्या ११ सभासदांची नावे सांगितली.

१. सोसायटी वर कोर्ट केस करणारे -
i. श्री अनिल टाकळकर
ii. श्री अमित/चंद्रशेखर कारखानीस
iii. श्रीमती सुवर्णा दीक्षित
२. सहयोग न करणारे -
i. श्री फहीम कोतवाल
३.पारिवारिक कारणाने कोर्टात केस असलेला -
i. कै मनोहर पगार यांचा परिवार.
४.तीस जून पर्यंत घरे सोसायटी च्या ताब्यात देणारे
i. श्री अजय डोंगरे
ii.श्री अतुल डोंगरे
iii. श्रीमती ऋता बावडेकर
iv. श्रीमती प्रेमलता इनामदार [redacted]
v. श्री साक्षात्कार जोशी
vi. श्री सुवर्णकांत ठाकोर

वरील चर्चेत श्री जयंत शाळीग्राम, श्री निखिल गीत, श्री अरविंद करंदीकर, श्री महेश प्रभुदेसाई, श्री राजाराम जोशी, श्री मोरेश्वर जोशी, श्री अभिजीत वारघडे, श्रीमती रसिका गुप्ता आदी सभासदांनी त्यांचे विचार आणि सूचना मांडल्या.

शेवटी सचिवांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

विनायक पटवर्धन
(सचिव)

पुणे पत्रकार सह. गृहरचना संस्था (मर्यादित)
रजि. नं. PNA / HSG / ६५८ ता. ३० - १ - १९७१
ता.